# जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा
# सिव्हिल लाईन,वर्धा

फोन नं. ०७१५२-२४३४४६/२४०८७२. वेब साईड - WWW.Wardha.nic.in.
फॅक्स नं.- ०७१५२-२४०५३३. ई-मेल - Wardhardc@gmail.com.

जिआव्यअ/प्रशि/कावि- २०५ /२०१७. दिनांक - १७ मे,२०१७.

## जाहिरात

वर्धा जिल्हयात रस्ता अपघाताचे प्रमाणात वाढ होत असल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक तयार करुन लावणे गरजेचे ठरते. त्या अनुषंगाने, रस्ता अपघाताचे प्रमाण कमी करण्याकरिता करावयाच्या उपाय योजनांतर्गत वर्धा जिल्हायातील सर्व (अंदाजे ५० ठिकाणांवर) रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक लावावयाचे असल्याने त्याबाबत सुचना फलक लावण्याकरिता अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्यांकडून तथा पुरवठाधारक यांचेकडून विहित नमुन्यातील निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा <u>www.wardha.nic.in</u> या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**कामाचे नाव -** आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत वर्धा जिल्हयामध्ये रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक लावण्याबाबत

**कामाची अंदाजित किंमत रुपये -** 2,00,000/- (अक्षरी - दोन लक्ष रुपये फक्त)

| | |
|---|---|
| कोरा निविदा फॉर्म | रु. 500/- |
| इसारा रक्कम 1% | रु. 2,000/- |
| सुरक्षा अनामत रक्कम 3% | रु. 20,000/- |
| निविदा प्रसिध्द करणे | दिनांक - 23/05/2017 सकाळी - 11.00 वा. |
| निविदा अर्ज उपलब्ध कालावधी | दिनांक - 23/05/2017 रोजी सकाळी 11.00 वाजेपासुन ते दिनांक - 30/05/2017 दुपारी 02.00 वाजेपर्यंत |
| निविदा पुर्व बैठक | दिनांक - 24/05/2017 ला दुपारी 1.00 वा. (निवासी उप-जिल्हाधिकारी वर्धा, यांचे दालनात) |
| संपर्क अधिकारी | श्री. मंगेश जोशी, निउजि तथा सदस्य सचिव, जिल्हा आपत्ती व्य. प्राधिकरण समिती, वर्धा. दुरधवनी क्र. 07152-240872 |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक - 30/05/2017 ला दुपारी 02.00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक/वेळ | दिनांक - 31/05/2017 ला दुपारी 03.00 वाजता. |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | निवासी उप-जिल्हाधिकारी, वर्धा यांचे दालन. |

**टिप -**

१) ज्या निविदा धारकांचे निविदा अर्ज (निविदा अटी व शर्ती तसेच तांत्रिक लिफाप्यात जोडावयाच्या साक्षांकित कागदपत्रांसह) सादर केले जातील केवळ त्याच निविदाधारकांच्या अर्जाचा विचार केला जाईल याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

२) प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्वीकारण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी, वर्धा यांनी राखून ठेवले आहेत.

३) सदर निविदेचा सर्व तपशिल, अटी व शर्ती www.wardha.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

४) निविदा अर्जाची विक्री व बयाणा रक्कम (EMD) या दोन्ही रक्कमा फक्त ऑनलाईन पेमेंट व्दारेच (नेट बँकिंग व्दारेच) स्विकारल्या जातील.

**जिल्हाधिकारी वर्धा,करीता**

प्रतिलीपी -

१) जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा यांनी सदर निविदा जाहिरात सर्व वृत्तपत्रांमध्ये वेळेत प्रकाशित करुन प्रकाशित निविदा जाहिरात चे कात्रण या कार्यालयास सादर करावे.

२) जिल्हा नाझर,वर्धा यांनी सदर निविदा जाहिरात प्रसिध्दिकरीता कार्यालयीन नोटीस बोर्ड वर लावण्यात यावी.

३) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी (NIC) वर्धा यांनी सदर निविदा जाहिरात वर्धा जिल्हा वेबसाईड वर अपलोड करुन प्रसिध्द करावी.

**जिल्हाधिकारी, वर्धा करीता.**

# SPECIFICATIONS

Design  of sign Board on Road in Wardha District.

**Size –** 3.3” (Height)
2.0” (Width)
0.4” (Thickness)

**Material –** Precast.

Cost Including cost of material, fixing on site with painting including fixing and provision of M.S. plate containing Location and distance details.



**कामाचे नाव -** आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत वर्धा जिल्हयामध्ये रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक लावण्याबाबत

**<u>निविदेच्या अटी व शर्ती</u> -**

वर्धा जिल्हयात रस्ता अपघाताचे प्रमाणात वाढ होत असल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक तयार करुन लावणे गरजेचे ठरते. त्या अनुषंगाने, रस्ता अपघाताचे प्रमाण कमी करण्यकरिता करावयाच्या उपाय योजनांतर्गत वर्धा जिल्हायातील सर्व (अंदाजे ५० ठिकाणी) रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक लावावयाचे असल्याने त्याबाबत सुचना फलक लावण्याकरिता अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्यांकडून तथा पुरवठाधारक यांचेकडून विहित नमुन्यातील निविदा मागविण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत, रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक लावण्याकरीता, पुरवठादाराने निविदा भरणे आवश्यक आहे. या करिता खालील नमुद केलेल्या अटी/शर्ती लागु राहतील.

1. निविदा अर्ज संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेऊन निविदा अर्जाची फी रुपये 500/- ऑनलाईन पेमेंटने जमा करणे आवश्यक आहे.
2. निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक - 30/05/2017 असून त्या दिवशी 2.00 वाजेपर्यंत निविदा स्विकरल्या जातील प्राप्त निविदा दिनांक - 31/05/2017 रोजी 3.00 वाजता निवासी उप-जिल्हाधिकारी, वर्धा यांचे समक्ष उघडण्यात येतील. निविदा उघडण्याच्या तारखेला काही अपरिहार्य/तांत्रिक कारणामुळे निविदा उघडता न आल्यास मा. जिल्हाधिकारी निर्देश देतील त्या तारखेला निविदा उघडण्यात येईल.
3. प्री-बीड कॉन्फरन्स (निविदा पुर्व बैठक) दिनांक - 24/05/2017 रोजी दुपारी 01.00 वाजता निवासी उप-जिल्हाधिकारी, वर्धा यांचे दालनात घेण्यात येईल.
4. निविदा **<u>www.wardha.nic.in</u>** या संकात स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
5. निविदेसोबत खालील कागदपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे.

**1) <u>दराचा लिफापा</u> -**

दर अक्षरी व अंकी अशा पध्दतीने लिहीलेल्या विहीत नमुन्यातील असणे आवश्यक आहे.. तसेच याबाबत खालील शर्ती पाळणे आवश्यक आहे. दर मागविण्यात आलेल्या वस्तुची यादी (BOQ) मध्ये नमुद केले आहे. त्यामध्ये प्रती नग दर सर्व करासहित भरणे आवश्यक राहिल.

**अ) <u>तांत्रिक निवीदेचा लिफापा</u> -** (या लिफाप्यात खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे.)

१) निविदा अर्ज फी रक्कम रुपये 500/- (रु. पाचशे फक्त) व इसारा/बयाणा रक्कम (EMD) रुपये 2,000/-(रु. दोन हजार फक्त) जमा करणे आवश्यक आहे.

२) निविदाधारकाचे संपूर्ण नांव व पत्याचा तपशिल आणि साहित्याचे Specifications - Form-II मध्ये नमूद करणे आवश्यक आहे. (सोबत नमूना जोडलेला आहे.)

३) From-III मध्ये साधन सामुग्री चा तपशिल किंमत (CAPABILITY STATEMENT) मध्ये नमूद

करणे आवश्यक आहे. (सोबत नमूना जोडलेला आहे.)

४) कोणत्याही शासकिय/निमशासकिय विभाग/कार्यालयाच्या कामाच्या बाबतीत काळ्या यादीत समावेश न काल्याबाबतचे शपथ पत्र तसेच भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली नसल्याचे तसेच कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (अँफिडेव्हीट) रु. 100/- च्या स्टँप पेपरवर सक्षम अधिकारी यांचे समक्ष केलेले असणे बंधणकारक आहे.

५) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वक्षरी करुन तसेच रबरी शिक्का मारुन अपलोड करावे.

**ब) <u>व्यापारी दराचा लिफापा</u> -**

निविदाधारकाने दिलेल्या कामाचे दर हे BOQ (Bill of Quantity) मध्ये भरत असतांना सदरचे दर हे सर्व करांसहीत व उप-करांसहीत भरणे आवश्यक आहे.

१) रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक लावण्याकरीता, त्यासाठी लागणारा अतिरिक्त खर्च (हमाली/ वाहतुक खर्च इ.) निविदाधारकास स्वतः करावा लागेल.

२) रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक लावण्याकरीता, व इतर बाबींची संपुर्ण जबाबदारी ही निविदाधारकाची राहिल. तसेच, आग किंवा नैसर्गीक आपत्ती किंवा दंगल किंवा रस्ता अपघात इत्यादी किंवा इतर कोणत्याही कारणाने शोध व बचाव साहित्य चे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास निविदाधारकास कोमत्याही प्रकारचा मोबदला मिळणार नाही.

३) निविदाधारकाचे संपूर्ण नावाचा तपशिल BOQ मध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

४) निविदेचा अर्ज व त्याच्याशी संबंधित कागदपत्रे अहस्तांतरणीय आहेत.

५) निविदेची वैधता निविदा मंजुर झाल्यापासून एक वर्षाची राहिल व मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने पुढील एक वर्षासाठी मुदत वाढविता येऊ शकेल.

**क)** बयाना/सुरक्षा अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय असणार नाही.

**ख)** नामंजुर निविदेबाबत बयाना रक्कम हि निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

**ग)** ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल त्यांना 7 दिवसाचे आत करारनामा व सुरक्षा अनामत रुपये 20,000/- (रु. वीस हजार फक्त) Demand Draft स्वरुपात जिल्हाधिकारी यांचे नावे वर्धा शाखेत देय असलेला राष्टियकत बँकेचा Demand Draft सादर करावा लागेल. तसेच, मंजुर निविदाधारकांची सुरक्षा अनामत रक्कम ही काम पुर्ण व सुस्थातीत झाल्याबाबत नंतर सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच परत करण्यात येईल. आणि सदर सुरक्षा रक्कम परत नेण्याची सर्वस्वी जबाबदारी ही निविदाधीकाची असेल. त्याबाबत या कार्यालयाकडून कोणतीही सुचना दिली जाणार नाही.

**घ)** मंजुर निविदाधारक विहित मुदतीत काम करण्यास असमर्थ ठरल्यास इतर पुरवठादारांकडून पुरवठा करुन घेण्यात येईल व त्यासाठी मंजुर दरापेक्षा अतिरिक्त खर्च झाल्यास सदरचा ज्यादा खर्च मंजुर निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

६) लिफापा क्रमांक 1 (तांत्रिक निविदेचा लिफापा) उघडून त्यातील कागदपत्रांची तपासणी करुन दिलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करत असेल तरच त्या निविदाधारकाचा दराचा लिफापा (BOQ) उघडणायत येईल. अन्यथा लिफापा क्रमांक 1 मध्ये त्रुटी आढळल्यास सदरची निविदा रद्द समजण्यात येऊन त्या निविदाधारकाची BOQ (लिफापा क्रमांक 2) उघडण्यात येणार नाहि.

७) प्राप्त निविदा मंजुर करणे अथवा नाकारणे आणि आवश्यक वाटल्यास विभागुन देणे, शर्ती व अटी बदलणे तसेच काही बाबी वगळुन आवश्यक वाटतील तेवढ्याच बाबींचा पुरवठा आदेश देण्याचे अधिकर मा.जिल्हाधिकारी निउजी यांनी राखून ठेवलेले आहेत.

८) तांत्रिक लिफाप्यात सादर केलेल्या कागदपत्राच्या विषयी कोणतेहि स्पष्टीकरण आवश्यक वाटल्यास मा.जिल्हाधिकारी मागवतील तसे लेखी स्पष्टीकरण सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहिल.

९) तांत्रिक लिफाप्यात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती निविदा उघडण्याच्या दिवशी मागणी केल्यास तपासणीकरिता सादर करणे बंधनकारक राहिल.

१०) लिफापा क्रमांक 2 सदरचा लिफापा (BOQ) मध्ये नमुद दरा व्यतीरिक्त कोणत्याहि प्रकारची वाढीव रक्कम/वाढीव खर्च (विक्रीकर,विविध कर,वाहतुक खर्च,हमाली,मेंटेन्स खर्च) मागणी केल्यास असा कोणताहि वाढीव खर्च दिला जाणार नाहि.

११) साहित्याचा सुस्थितीत पुरवठा झाल्यानंतर आणि सक्षम प्राधिकारी यांनी पुरवठा समाधान कारकरित्या पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच देयकांची रक्कम अदा करण्यात येईल.

१२) पुरवठादाराने उक्त नमुद केलेले काम विहित मुदतीत पुर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सदरच्या कामातील बाबनिहाय दिलेल्या तांत्रिक वैशिष्ट्यांसह, परिमाण व पुरवठा आदेशामध्ये देण्यात आलेल्या सुचना व संख्या यांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

१३) पुरवठादाराने पुरवठा करावयाचे साहित्य, सामग्री दिलेल्या ठिकाणापर्यंत पोहोच होण्यापुर्वी नैसर्गिक आपत्ती अगर इतर काणास्तव नुकसान झाल्यास त्यात शासन जबाबदार राहणार नाही.

१४) नेमुन दिलेल्या तारखेस व कळविण्यात आलेल्या ठिकाणी निविदेतील साहित्याचा पुरवठा योग्य त्या वाहनाने वाहतुक करावा लागेल. त्याकरिता वाहतुकिचा वेगळा खर्च देय राहणार नाही.

१५) पुरवठादारास कोणत्याहि प्रकारचा अग्रीम (Advance) देण्यात येणार नाही.

१६) सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

१७) ज्या निविदेमध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. जर अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत असल्यास दोन्हीपैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

१८) या निविदा कामातील मागणी कमी/जास्त होवू शकते.

१९) रस्ता अपघात प्रवण स्थळांवर सुचना फलक लावण्याकरीता चे दर हे निविदा स्विकृती नंतर एक वर्षाकरिता अस्तित्वात राहतील.

२०) शासन नियमाप्रमाणे बिलातून आयकर/सेवाकर त्यावरिल सरचार्ज कापून घेण्यात येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची किंवा दोन्हीही मागणी केल्यास त्याची भरपाई निविदाधारकास करावी लागेल.

२१) निविदा प्रक्रियेच्या दरम्यान किंवा निविदा स्विकृती बाबत कोणतेही विवाद उद्‌भवल्यास मा.जिल्हाधिकारी वर्धा यांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहील.

२२) देयकाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास मूळ रक्कमच अदा करण्यात येईल, त्यावर कोणतेही व्याज दिले जाणार नाहि. तसेच देय रक्कमेतून नियमानुसार आयकर व अधिभार (TDS) वजा करुन घेतली जाईल.

२३) निविदा दरम्यान कुठलेहि कायदेविषयक वाद/विवाद उद्‌भवल्यास वर्धा कोर्टाचे कार्यक्षेत्रातच राहील.

२४) मंजुर निविदेची वैधता पूर्ण झाल्यानंतर अपवादात्मक परिस्थितीमध्ये निविदेचा कालावधी एक वर्षा करिता वाढविण्याचा अधिकार मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांना राहील.

२५) निविदा मंजुर झाल्यानंतर मंजुर निविदाधारकास रुपये 100/- च्या स्टँम्पपेपरवर करारनामा पत्रावर लिहून देणे बंधनकारक राहिल.

२६) तांत्रिक निविदा उघङतांना निविदाधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच निविदामधिल तांत्रिक बाबी बाबत आक्षेप असल्यास दराचा लिफापा उघङण्यापुर्वी आक्षेप निविदा समिती समोर सादर करावा. दराचा लिफापा उघङल्यानंतर कोणत्याहि आक्षेपावर विचार केल्या जाणार नाही.

२७) वरिल अटी व शर्ती चे उल्लंघन केल्यास निविदाधारक फौजदारी कारवाईस पात्र राहतील. तसेच त्यांची सुरक्षा अनामत जप्त करणे, झालेल्या कामाचे देयक अंशतः अथवा पुर्णतः नाकारणे अथवा रोकणे, निविदाकारास काळ्या यादीत टाकणे हे सर्व अधिकार जिल्हाधिकारी व निवासी उप-जिल्हाधिकारी, वर्धा यांना राहतील.

**निवासी उप-जिल्हाधिकारी, वर्धा**

**निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या सर्व मला मान्य आहेत.**

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**निविदाधारकाचे नांव,पत्ता व सही (रबरी शिक्यासह)**

लखोटा - १

(तांत्रिक लिफापा)

निविदा अर्ज - अ

(निविदा किंमत - रु. ५००/-)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निविदाधारकाचे नांव. | : | |
| २. | पूर्ण पत्ता. | : | |
| ३. | संस्थेचा तपशिल (कंपनी/फर्म/मालकी/भगिदार/ट्रस्ट/इतर प्रकार नमुद करावा) | : | |
| ४. | निविदा अर्जाच्या किंमतीचा तपशिल 5००/- | : | |
| | बयाना रक्कमेचा तपशिल 2,०००/- | : | |
| ५. | संपर्काचा तपशिल | : | |
| | अ) दुरध्वनी क्रमांक | : | |
| | आ) फँक्सचा क्रमांक | : | |
| | इ) संकेत स्थळ/ई-मेल | : | |
| ६. | आयकर पँनकार्डची प्रमाणित प्रत | : | |
| ७. | कामाबाबतचे अनुभव प्रमाणपत्र | : | From-I जोडला आहे/नाही |
| ८. | कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाचाया कामाचे बाबतीत काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | : | |
| ९. | निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र | : | |

**निविदाधारकाची सही व शिक्का.**

**टिप -** जे निविदाधारक लखोटा क्र. १ मधील बाबींची पुर्तता करतील त्यांचाच लखोटा क्र. २ उघडण्यात येईल. दोन्ही लखोटे वेगवेगळे असावेत व ते एका सीलबंद लखोट्यात ठेवावेत.

**From - I**

## कामाच्या अनुभवाचा तपशिल

**(अ)**निविदेव्दारे घेतलेल्या कामांची यादी आणि त्यापैकी ही निविदा भरलेल्या दिनांकास पूर्ण झालेली कामे.

| अ.क्र. | कामांचे नाव | कामाचे ठिकाण | पूर्ण केलेल्या कामाचे तपशिल | काम पूर्ण झालेयाची तारिख | निविदेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

(ब) सदरची निविदा भरते वेळेस चालू असलेल्या कामांची यादी.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे ठिकाण | सुरु असणा-या कामाचा तपशिल | चालु असलेली कामे पूर्ण होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |

टिप - सोबत संबंधीत अनुभवाचे संबंधीत अधिका-याचे स्वक्षरिचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

<u>लखोटा - २</u>

**From - III**

**<u>(दर पत्रक)</u>**

**Tender Inviting Authority :-** District Collector & District Disaster Management Comity, Wardha.

**Nature of Work :-** Design of sign Board on Road in Wardha District.

**Contract No. :-**

**Bidder Name :-**

## <u>Schedule of Works.</u>

This BOQ template must not be modified/replaced by the bidder and the same should be after the relevant columns else the bidder is liable to be rejected for this tender. Bidders are allowed to enter the Bidder Name Values only.

| **Sr. No.** | Description of work | No of Qty. | Unit | Estimated Rate (in Rs.) | RATE IN Figures To be entered by Bidder Rs. P. | | Amount Rs. P. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Figures | Words | |
| 1. | Design of sign Board on Road in Wardha District. | 01 | 01 | | | Rupees only | |

**निविदाधारकाची सही व शिक्का.**